डॉ. प्र. शं. नारखेडे
एम.ए., पीएच डी.
कुलसचिव

767
14.6.05

'नॅक' अधिस्वीकृत - 'ब' श्रेणी

संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती-४४४ ६०२
(महाराष्ट्र)

क्र.अवि/६-ड/ए-177/२००५
दिनांक : ७ जून, २००५

प्रति,

प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये, आणि
विभाग प्रमुख,
रासायनिक तंत्रशास्त्र शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पासून पदवी स्तरावर पर्यावरणात्मक अभ्यास हा विषय अनिवार्य रुपात नेमण्याबाबत**

महोदय,

१) सहसचिव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दि.३१.०७.२००३ च्या पत्राव्दारे माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार पर्यावरणात्मक अभ्यास हा विषय पदवीपूर्व अभ्यासक्रमांमध्ये विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील सर्व विद्याशाखांमध्ये समाविष्ट करण्याबाबत कळविले होते आणि याच पत्रासोबत सदर विषयाचा नमूना अभ्यासक्रम सुद्धा विद्यापीठाला पाठविला होता.

२) अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १४.१०.२००३ च्या पत्राद्वारे असे सूचित केले होते की मा.सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ८६०/१९९१ मध्ये दिनांक २२.११.१९९१ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पर्यावरणात्मक अभ्यास हा विषय महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करुन तो सक्तीचा करता येईल किंवा कसे? याची पडताळणी करुन योग्य तो निर्णय घेऊन सदर निर्णय कळविण्याबाबत सूचित केले होते.

३) विद्यापीठाच्या विद्वत परिषदेने दि.२४.८.२००३ रोजी भरलेल्या बैठकीत मुद्दा क्र.४६ अंतर्गत पर्यावरणात्मक अभ्यास हा विषय शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून अनिवार्य रुपात सुरु करण्याबाबत निर्णय घेतला होता. या निर्णयाच्या अनुषंगाने सदर विषय अनिवार्य रुपात खाली नमुद असलेल्या पदवी अभ्यासक्रमांसमोर नमूद असलेल्या वर्षाला/सत्रांना लागू करण्यासाठी क्र.४२/२००५ हा अध्यादेश व्यवस्थापन परिषदेने मान्य केला आहे तसेच मा.कुलगुरुंनी सदर अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थ्यांकडून वसुल करावयाच्या अतिरीक्त शुल्काबाबत क्रमांक ५/२००५ हा निदेश प्रसारीत केला आहे.

| | |
|---|---|
| 1) Bachelor of Arts | (Second Year) |
| 2) Bachelor of Performing Arts | (Second Year) |

दुरध्वनी : का. कार्यालय- ०७२१-२६६२१७३, २६६०९४८ निवास- ०७२१-२६६२२०४
फॅक्स क्र. ०७२१-२६६०९४९, २६६२१३५ ग्राम : अमुनि
Website : www.amtuni.com E.Mail : reguni@amtuni.com

आणि

त्या अर्थी, शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९३/(५९१८)/मशी-३ , दिनांक १९ जून, १९९५ व शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९९/(३६३/९९)/मशी-३ , दिनांक २९ डिसेंबर , १९९९ नुसार यापुर्वी महाविद्यालयाने एका वर्गात / तुकडीत प्रवेशीत केलेल्या विद्यार्थी संख्येच्या नामांकनास मान्यता देण्यात आलेली आहे. अशा प्रवेशीत नामांकनास संरक्षीत करण्यात येत आहे.

आणि

त्या अर्थी, उपरोक्त शासन निर्णयानुसार, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाअंतर्गत असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखामधील सर्व अभ्यासक्रमांची प्रत्येक वर्गातील / तुकडीमधील विद्यार्थी प्रवेश क्षमता खालीलप्रमाणे निर्धारीत करण्यात येत आहे.

| तुकडी क्रमांक | प्रवेश क्षमता |
|---|---|
| पहिली | ००१ ते १२० |
| दुसरी | १२१ ते २०० |
| तिसरी | २२१ ते ३०० |
| चौथी | ३२१ ते ४०० |
| पाचवी | ४२१ ते ५०० |
| सहावी | ५२१ ते ६०० |
| या प्रमाणातच पुढील तुकड्यांमधील विद्यार्थी प्रवेश क्षमता सुध्दा निर्धारीत करण्यात येत आहे. | |

आणि

ज्या अर्थी, अध्यादेश तयार करण्याकरीता लागणारा दीर्घ कालावधी लक्षात घेता मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १४ (८) अंतर्गत निदेश निर्गमित करुन तातडीने अंमलबजावणी करावी, असे व्यवस्थापन परिषदेने ठरविले असल्यामुळे.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १४ चे उपकलम (८) अंतर्गत असलेल्या तरतुदी मधील प्राप्त अधिकारान्वये मी, डॉ. मोहन खेडकर, कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या द्वारे असे निदेशीत करीत आहे की,

१) "कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखामधील प्रत्येक तुकडीमध्ये किती विद्यार्थी संख्या असावी याबाबतचे परिमाण / निकष म्हणून हा निदेश-२०१३ ओळखल्या जाईल."

२) हा निदेश अमरावती विद्यापीठ राजपत्र भाग - १ मध्ये प्रकाशीत होईल, त्या दिवसापासून अंमलात येईल.

३) प्रवेशासंदर्भात शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९३/(५९१८)/मशी-३ , दिनांक १९ जून, १९९५ व शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९९/(३६३/९९)/मशी-३ , दिनांक २९ डिसेंबर , १९९९ मध्ये देण्यात आलेले सुचना / आदेश बंधनकारक राहतील.

४) शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९३/(५९१८)/मशी-३, दिनांक १९ जून, १९९५ व शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९९/(३६३/९९)/मशी-३ , दिनांक २९ डिसेंबर , १९९९ हे दोन्ही शासन निर्णय अनुक्रमे परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" म्हणून जोडलेले आहेत.

स्वा/-
(मोहन खेडकर)
कुलगुरु
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

दिनांक : १०/०५/२०१३.